# प्रेसनोट

दि.३१/०८/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | श्रीगोंदा पो.स्टे., जि.अहमदनगर गुरनं.७७२/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | आकाश नारायण काशीकेदार, तलाठी सजा पेडगांव, वर्ग–३, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | २,००,०००/– रुपये तडजोडी अंती १,५०,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ---- |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी त्यांच्या मित्राकडून भाडे तत्वावर पोकलेन मशिन कामाकरीता घेतला होता. सदरचा पोकलेन दि.११/७/२०२३ रोजी रात्री ०१.०० वा. पेडगांव येथील तक्रारदार यांच्या परिचयाचे इसम यांच्या शेतात लावलेला असतांना पेडगांवचे तलाठी काशीकेदार व मंडळाधिकारी डहाळे हे सदर पोकलेन लावले ठिकाणी आले व तक्रारदार यांना तुम्ही सदरचा पोकलेन वाळु उपसा करणेकरीता वापरत असल्याचे सांगुन तक्रारदार यांना तुमच्या पोकलेन वर केस व दंडात्मक कारवाई न करण्यासाठी ३,००,०००/– रुपये आम्हाला दयावे लागतील असे म्हणाले व दि.११/०७/२०२३ रोजी सकाळी तहसिल कार्यालय, श्रीगोंदा येथे तक्रारदार यांना भेटण्यास बोलवले. त्यानंतर तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर येथे त्यांची लाच मागणीची वरील प्रमाणे तक्रार नोंदविली. त्यानुसार दि. ११/०७/२०२३ रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात आली, पडताळणी कारवाई दरम्यान यातील आरोपी लोकसेवक आकाश नारायण काशीकेदार, तलाठी सजा पेडगांव, वर्ग–३, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचेकडे २,००,०००/– रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती १,५०,०००/– रुपये लाच मागणी करुन ती लाच रक्कम टप्प्या टप्प्याने स्वीकारण्याची तयारी दर्शविली म्हणून आज दि.३१/०८/२०२३ रोजी श्रीगोंदा पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(प्रविण लोखंडे)

पोलीस उप अधीक्षक,

अॅन्टी करप्शन ब्युरो, अहमदनगर